## ॥ श्री ॥
## ॥ बाबा ॥
## बाबांची दृष्ट

दृष्ट काढू या ग दृष्ट काढू या
माझ्या गणूबाबाची दृष्ट काढू या ॥धृ.॥

नाक सरळ सुंदर डोळे ह्याचे पाणीदार
भालावरी चंद्रकोर, दिसतो कसा बाणेदार
त्याची दृष्ट होईल ह्याला,
दृष्ट काढू या गं दृष्ट काढू या माझ्या गणूबाबाची दृष्ट काढू या ॥
पायी पैंजण दंडी वाळे, रूणू झुणू घुंगरू वाले
कमरेस पट्टा शोभे, माथ्यावरी मोरपीस झुले ॥2॥

त्याची दृष्ट होईल ह्याला,
दृष्ट काढू या ग दृष्ट काढू या माझ्या गणूबाबाची दृष्ट काढू या ॥

शिंक्यावरचे माखन खाई, नैवेद्याचे मोदक चोरी
यशोदेस ब्रह्मांड दावी, पेंद्यासवे गुरे राखी
त्याची दृष्ट होईल ह्याला,
दृष्ट काढू या ग दृष्ट काढू या माझ्या गणूबाबाची दृष्ट काढू या ॥

★★★★★